Paper No - XII
Group - A

Date: / /
Page No.:

# कला व वाणिज्य महाविद्यालय वडूज. BA III

## इतिहास विभाग

सत्र - 2018-2019

ARTS & COMMERCE COLLEGE
Tal Khatav Dist. Satara (M.S.)
VADUJ

Seen

Seen

Champ's IKON Symbol of Scholars

Scanned with CamScanner

TOPIC

Date: / /

Page No.:

नाव - स्वप्नाली इंगळे

वर्ग - BA III

पेपर नं आर्थिक - 12

रोल नंबर - 553

प्रकल्पाचा विषय - सातवाहन आणि कुशान काळातील प्रमुख सम्राट व त्यांची कार्य आणि कलावस्थापत्य

मार्गदर्शक -

श्री गुजर व्ही. बी

श्री घोर्गे आर. एम

Champ's IKON (Symbol of Scholars)

Scanned with CamScanner

Page No. Date :

# गट प्रकल्प
# गटातील विदयार्थी सदस्य

| अ.क्र | नाव | रोल नंबर | सही |
|---|---|---|---|
| 1] | बडे अभिजित बाबासो | 549 | A.B.Bade |
| 2] | बागल इंद्रजित दिलीप | 550 | Bagal I.D. |
| 3] | बागल वैशाली केशव | 551 | V.Bagal |
| 4] | गोडसे ओंकार आनंदराव | 552 | O.A Godse |
| 5] | इंगळे स्वप्नाली आशिक | 553 | Ingale |
| 6] | जाधव ज्योती कृष्णा | 554 | Jadhav |
| 7] | जाधव प्रज्ञा ज्ञानदेव | 555 | P.Jadhav |

colors

Scanned with CamScanner

TOPIC

Date:

Page No.:

# अनुक्रमणिका

अ.नु - विषयसूची

1- ऋणानिर्देश

2- प्रस्तावना

3- उद्दीष्ट्ये

4- गृहितके

5- सातवाहन आणि कुशान काळातील प्रमुख सम्राट व त्यांची कार्ये आणि कलास्थापत्य

6- आभार

Scanned with CamScanner

# ऋणनिर्देश

कला व वाणिज्य महाविद्यालय वरूड मध्ये BA भाग III या वर्गात असून इतिहास प्रात्यक्षिक या विषय अंतर्गत ग्रामीण अर्थव्यवस्था आणि समाज या विषय अंतर्गत प्रकल्प पूर्ण करीत असताना मला माझ्या मित्र मैत्रिणींनी मला मदत केली. मी त्यांची ऋणी आहे.

तसेच मला विषय शिक्षक प्राध्यापक, गुजर सर व धार्वे सर यांनी योग्य मार्गदर्शन केले. त्यामुळे त्याबद्दल मी त्यांची ऋणी आहे.

Scanned with CamScanner

# प्रस्तावना

प्राचीन भारताच्या इतिहासात पहिले विस्तारित साम्राज्य निर्माण करण्याचा मान मौर्य घराण्यातील सम्राट चंद्रगुप्त मौर्य व सम्राट अशोक यांना आहे. मौर्य काळात प्रथमच भारतीय समाजाचा सर्वांगीण विकास झाला. मात्र मौर्य साम्राज्याच्या पतनानंतर भारतात मोठे राजकीय अराजक माजले माजले. परिणामी मौर्यांच्या मांडलिक सत्तांनी आपल्या स्वतंत्र सत्ता निर्माण करण्याचा प्रयत्न केला. उत्तर भारतात शुंग व कण्व या ब्राह्मण घराण्यांच्या सत्ता निर्माण झाल्या, तर दक्षिणेत सातवाहन या ब्राह्मण घराण्याने आपले प्रभुत्व निर्माण केले. त्याचवेळी भारतात शक, कुषाण या परकिय सत्तांनी आक्रमण करून त्यांनीही भारतात आपल्या सत्ता निर्माण केल्या होत्या. कुषाण हे भारतीय धर्म व संस्कृतीशी एकरूप झालेले परकीय होते. त्यांनी निर्माण केलेले साम्राज्य भारतीयांचा जगाशी संबंध येण्याच्या दृष्टीने महत्वाचे ठरले. कुशान आणि कनिष्क भारतातील बलाढ्य सम्राट होता.

# उद्दीष्ट्ये

सातवाहन घराण्याने प्रथम दक्षिणेत राजकीय सत्तेचा पाया घातला हे समजते.

महाराष्ट्राच्या प्राचीन इतिहासात सातवाहन युग एक सुवर्णयुग होते हे समजते.

दक्षिण भारतात सातवाहनांनी प्रथम एक मोठे व समृद्ध साम्राज्य निर्माण केले हे समजते

सातवाहनांनी दक्षिणेत राजकीय इतिहासाची परंपरा निर्माण केली हे समजते

सातवाहनांमुळे दक्षिणेत स्वतंत्र सत्ता अस्तित्वात आल्या हे समजते.

सातवाहनांच्या पासून दक्षिण भारतात नागरीकरणास सुरुवात झाली हे समजते.

महाराष्ट्रातील पहिले राजकीय घराणे म्हणून सातवाहन घराण्याची ओळख होते.

जगाच्या नकाशावर महाराष्ट्राला सर्वप्रथम झळकविणारे सातवाहन आद्य राजघराणे होय हे समजते

सातवाहनांचा कालखंड म्हणजे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाचा पाया हे समजते.

Scanned with CamScanner

# गृहितके

* आपणास या प्रकल्पामधून पूर्व इतिहासकालीन माहिती मिळते.

* आपणास या प्रकल्पामधून इतिहास विषयी ज्ञान मिळते.

* इतिहासात असे प्रकल्प केल्याने इतिहासाची माहिती मिळते.

* आपणास या इतिहास या विषयाने मुघल कालीन भारताच्या इतिहास या विषयी माहिती मिळते.

* या प्रकल्पामधून विद्यार्थ्यांमध्ये इतिहास विषयाच्या अभ्यासाची रुची निर्माण करण्यास मदत होते.

Champ's IKON

Scanned with CamScanner

# कला व स्थापत्य

मौर्यांच्या नंतर भारतात अनेक परकीय सत्तांनी आपल्या सत्ता प्रस्थापित केल्या. त्यामध्ये कुशाण शकांच्या प्रमाणे भारतीय धर्म व संस्कृतीशी एकरूप झालेले होते. कुशाणांच्या समकालीन दक्षिण भारतात सातवाहनांनी आपल्या आपले साम्राज्य निर्माण केले होते. कुशाण व सातवाहन काळात इंडो-ग्रीक कलेचा प्रभाव वाढला होता. पण या काळात आपल्या भारतीय कलांना महत्त्व प्राप्त होऊन कला व स्थापत्य क्षेत्रात भारतीयांनी मोलाची कामगिरी केली आहे. सातवाहनांनी स्थापत्य व लेणी या क्षेत्रात विशेष काम केले. त्यामुळे पैठण, तेर, भोगवर्धन, ब्रम्हपुरी सारख्या अनेक कला केंद्रांचा उदय झाला. या कला केंद्रामध्ये जागतिक किर्तीचे कलाकार निर्माण झाले त्यांनी सह्याद्रिच्या कुशीत म्हणजे कान्हेरी, कार्ले, भाजे, बेडसा, नासिक, जुन्नर, अजिंठा आदि ठिकाणी शेकडो लेणी तयार केली. राजकीय स्थैर्य, आर्थिक सुबत्ता व धार्मिक औदार्य यांच्या जोरावर कला व स्थापत्य या क्षेत्रात प्रचंड काम केले. म्हणून आपणाला कुशाण व सातवाहन काळातील कला - स्थापत्याचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे.

Scanned with CamScanner

# स्थापत्य

कुशाण व सातवाहन कालखंड व कलेच्या इतिहासातील सोनेरी पान मानला जातो. त्यांनी भारतात एक दैदिप्यमान परंपरा निर्माण केली. या काळात आंतरराष्ट्रीय कितीच्या अजोड अशा कलाकृती निर्माण झाल्या. सातवाहन काळात दोन प्रकारच्या वास्तू निर्माण झाल्यामुळे दिसते. एक नागरी वास्तू व दुसरी धार्मिक वास्तू

# नागरी वास्तू

नागरी वास्तूमध्ये सार्वजनिक व खाजगी वास्तूंचा समावेश होतो. सार्वजनिक वास्तूमध्ये राजप्रासाद, उद्याने, धर्मशाळा यांचा समावेश होतो पैठण, तेर, अमरावती इत्यादी ठिकाणी अशा प्रकारच्या वास्तू निर्माण झाल्या होत्या. तत्कालीन अनेक लेखकांनी या वास्तूबद्दल लिहिले आहे गुणाढ्याने पैठणमधील वास्तूचे वर्णन केले आहे. अमरावती, नागार्जुनकोंडा, नासिक, ब्रह्मपुरी, पैठण, तेर येथील उत्खननातून अनेक खाजगी वस्तू प्रकाशात आल्या आहेत. शूद्रकाच्या मृच्छकटीकात श्रीमंत लोकांच्या वास्तूंचे वर्णन आढळते. त्याने वसंतवाडा आठ चौकी होता. अशाप्रकारचे वाडे काही एकर क्षेत्रफळावर उभारले जात असावेत असे वाटते.

Champ's IKON (Symbol of Scholars)

Scanned with CamScanner

# धार्मिक वास्तु

कुषाण व सातवाहन काळात प्रामुख्याने बौद्ध धर्माचा प्रसार अतिव्यापक प्रमाणावर झाला. बौद्ध धर्माच्या प्रसारामुळे वास्तुकलाक्षेत्रात एका नव्या युगाचा प्रारंभ झाला. त्यामधून शेकडो विहार अनेक चैत्य व स्तूप आकारास आले. धर्मप्रसाराच्या निमित्ताने बौद्ध भिक्षू वर्षाचे आठ महिने देशभर प्रवास करीत. पण वर्षा ऋतूत त्यांना फिरणे कठीण जात असे. प्रचलित नियमाप्रमाणे ते लोकवस्तीमध्ये किंवा नगरामध्ये थांबू शकत नसत. वर्षा ऋतूत त्यांना स्वस्थपणे एका जागी निवास करता यावा म्हणून विहारांची निर्मिती करण्यात आली. या प्रेरणेतून सह्याद्रीच्या कुशीत शेकडो विहार निर्माण झाले. लौकिक अर्थाने त्यांना लेणी म्हटले जाते. अनेक लेण्यांमध्ये दानलेख सापडतात. नंतरच्या काळात भिक्षूंना प्रार्थना व्यवस्थित करता यावी म्हणून विहारालय लगतच प्रतिकात्मक स्तूप कोरले जाऊ लागले. अशा प्रकारच्या स्तूपयुक्त विहारास चैत्य म्हटले जाऊ लागले. अशा प्रकारे धार्मिक वास्तूंचे तीन गटात वर्गीकरण केले जाते. स्तूप, चैत्य व विहार. गौतम बुद्ध व प्रसिद्ध भिक्षूंच्या अवशेषांवर जी स्मारकवास्तू उभारली जाते तिला स्तूप म्हटले जाते. आच्छादनयुक्त विहारातील स्तूपाला चैत्य म्हटले जाते तर भिक्षूंच्या निवासासाठी जी वास्तू कोरली जाते तिला विहार म्हटले जाते.

हे स्तूप हे चिरंतन आनंद देणारे श्रद्धास्थान असल्याने त्यांच्या निर्मितीमध्ये कलात्मकतेचा उच्चांक आढळतो. तर चैत्य दगडात कोरलेले असल्याने कल्पनेच्या भरारीवर मर्यादा येतात. याउलट संन्यस्त जीवन जगणाऱ्या भिक्षूंना साध्यातील साधे निवासस्थान हवे म्हणून विहार कलात्मक पद्धतीचा अभाव दर्शविणारे दिसतात. कान्हेरी, जुन्नर, नाशिक, कार्ले, भाजे, पितळखोरा ही सर्व स्थळे व्यापारी मार्गावर असून ती विहारांच्या दृष्टीने प्रसिद्ध आहेत.

## स्तूप

स्तूप हा संस्कृत शब्द असून त्याचा अर्थ लोकांची श्रद्धा असणारे स्मारक होय. गौतम बुद्धांच्या किंवा भिक्षूंच्या अवशेषावर अशा प्रकारच्या वास्तू उभारण्यात येत असत. स्तूपाची निर्मिती ही मौर्यकालीन प्रेरणा असून सातवाहनकाळात तिचा फार मोठ्या प्रमाणात विकास झाल्याचे दिसते. अमरावती येथे उभारलेला स्तूप याचे उत्तम उदाहरण होय.

स्थूलमानाने स्तूपाचे तीन प्रकार आहेत. 1] शारीरिक 2] उद्देशिक 3] पारिभोगिक. शारीरिक अवशेषावर उभारलेला शारीरिक स्तूप होय. उद्देशिक स्तूप म्हणजे बौद्ध प्रार्थना मंदिरे होत आणि पारिभोगिक स्तूप म्हणजे बुद्धांच्या किंवा श्रेष्ठ भिक्षूंच्या प्रातिनिधिक अवशेषावर उभारलेला स्तूप होय.

Champ's IKON Symbol of Scholars

Scanned with CamScanner

Date: / /

Page No.:

महाराष्ट्रात व संपूर्ण देशात या सर्व प्रकारचे स्तूप अस्तित्वात असल्याचे दिसते. सम्राट अशोकाने सांची येथे उभारलेल्या अतिभव्य स्तूपाच्या भोवती सातवाहन काळात कलाकुसरीची तोरणे बांधण्यात आली. ही तोरणे म्हणजे सातवाहनकालीन कलेचा उत्तम नमुना आहे. पण पुढे रोमन संपर्क वाढत गेल्यामुळे रोमन प्रभावाचे दर्शन घडविणारी आणि दक्षिणेची जवळीक असणारी कला साकार झाली.

बौद्ध धर्माचा आरंभ प्रथम विदर्भात झाली. भंडारा जिल्ह्यातील पौनी हे बौद्ध धर्म प्रसाराचे केंद्र होते. पौनी येथे दोन स्तूपाचे अवशेष सापडले आहेत. चांडकपूर स्तूप पौनीजवळ 2 कि.मी अंतरावर चांडकपूर टेकडीवरील उत्खननात सापडला आहे. त्याचा व्यास 41.60 मीटर असून त्याची उंची 7.50 मीटर होती. स्थापत्य कलेच्या दृष्टीने हा स्तूप महत्त्वाचा आहे. चांडकपूर टेकडीच्या जवळच हरदोलालच्या टेकडीचे उत्खनन केले असता तेथेही एका स्तूपाचे अवशेष सापडले आहेत. नागरा येथे अलिकडे झालेल्या उत्खननातून आणखी एका स्तूपाचे अवशेष हाती आले आहेत. मराठवाड्यात धाराशिव जिल्ह्यातील तेर येथे थेरवादी भिक्खूंचे पवित्र स्थान असून तेथे स्तूप बांधलेले आहेत.

Champ's IKON Symbol of Scholars

Scanned with CamScanner

# अमरावतीचा स्तूप

आंध्र प्रदेशातील अमरावती हे शहर मथुरा, तक्षशिला या शहाराप्रमाणे प्राचीन शहर आहे. ते भारतातील कलेचे तिसरे महत्त्वाचे केंद्र आहे. अमरावतीचा स्तूप भारतातील वास्तुकलेचा अप्रतिम नमुना होता. या स्तुपाचा व्यास 162 फूट, बाजूच्या कोरीव शिल्पांचे क्षेत्र सुमारे 1700 चौरस फूट असल्याचा तज्ज्ञांचा अंदाज आहे. या स्तूपाचे बांधकाम संगमरवरी दगडात केलेले होते. भारहूत व सांची येथील स्तुपापेक्षा हा स्तूप वेगळा ठरतो. अमरावतीच्या स्तूपाचा स्तुपावर रोमन शिल्पकलेचा प्रभाव आहे.

अमरावती व नागार्जुनकोंडा येथील स्तूप बौद्ध वास्तुकलेचे व शिल्पकलेचे उत्कृष्ट नमुने होत. या स्तुपावरून सातवाहनकालीन बौद्ध धर्माचे व्यापकत्व स्पष्ट होते. सातवाहन कालीन वास्तुकला व शिल्पकला अत्यंत उच्च प्रतीची होती. हे या स्तुपावरून स्पष्ट होते.

Date: / /
Page No.:

# कनिष्कचे स्तूप व विहार

कनिष्कने गांधार कलेला आश्रय दिला होता. त्याने आपल्या साम्राज्यात अनेक स्तूप व विहार बांधले होते. तक्षशिलेजवळ सिरमुख व काश्मीरमध्ये कनिष्कपुर ही नगरे त्यानी वसविली होती. कनिष्कपुर - पुरुषपुर म्हणून प्रसिद्ध होते. पुरुषपुर येथे 13 मजली एक लाकडी इमारत बांधली होती.

कनिष्कच्या साम्राज्यात शिल्पकलेच्या उत्तम नमुने आढळतात. त्याने पुरुषपूर म्हणजे पेशावर येथे चैत्यमूर्ती तयार केली होती. ती मूर्ती पाहून अनेक परकीय प्रवासी आश्चर्यचकित होत असत. त्याने कलेला मोठा आश्रय दिला.

# चैत्यगृहे व लेणी

चैत्यगृहे व स्तूपयुक्त प्रार्थना मंदिरे होत. चैत्याचा आकार दंडगोला कृती असून त्याच्या मागील अर्धवर्तुळाकार जागेत स्तूपाची दगडावरील प्रतिकृती कोरलेली असते. या गुंफा सम्राट

अशोकाने प्रथम कोरल्या. या गुंफापासून चैत्य व विहार किंवा शैलगृहाच्या कलेच्या विकासाच्या आरंभ होतो. लेणी किंवा विहार परिसरातील गुंफा, गुंफा तीन प्रकारच्या आहेत. एक आयताकृती गुंफा, अर्धगोलाकार गुंफा आणि तिसरी वरील दोहोंचे एकत्रीकरण. चैत्याच्या छताचा आकार गजपृष्ठाकार, तर विहाराच्या छताच्या आकार आयताकृती पद्धतीचा असतो. हा या वास्तूंमधील महत्त्वाचा फरक होय. सातवाहनांच्या काळात महाराष्ट्राच्या सह्याद्री परिसरात लहानमोठी ९१२ लेणी आकारास आली.

नाशिक, जुन्नर, पैठण, ठाणे, कल्याण, कऱ्हाड यासारख्या व्यापारी महामार्गावर महत्त्वाच्या शहराला लागून शैलगृहे निर्माण आली असावी असे वाटते. आजे येथील लेणी सर्वात प्राचीन तर त्यालगत असणारे कार्ल्याचि लेणी सर्वात नेत्रदीपक आहे.

या सर्व वास्तू दगडात कोरलेल्या वास्तू आहेत. अकरणात्मक कोरीव काम म्हणून या वास्तू ओळखल्या जातात. विहार सामान्यत भिक्षूंच्या विश्रांतीसाठी असल्याने त्यांचा आकार साधा, खोलीसारखा, आयताकृती दालनासारखा असतो.

Champ's IKON

Scanned with CamScanner

TOPIC

Date: / /

Page No.:

# आभार

या शैक्षणिक वर्षापासून महाविद्यालय यातील B.A भाग 3 या वर्षासाठी इतिहास अभ्यास या विषयाअंतर्गत विषय प्रकल्प करण्याची संधी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांनी उपलब्ध करून दिली त्याबद्दल शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांची ऋणी आहे.

विषय प्रकल्प करीत असताना, विषय स्वतंत्र प्रत्येकी प्रश्नासाठी योग्य मार्गदर्शन व सातत्याने प्रोत्साहन दिल्याबद्दल माननीय प्राचार्य जाधव एल.जी यांची मी आभारी आहे.

या विषय प्रकल्पामधून योग्य मार्गदर्शन प्रकल्पामध्ये प्रा. धार्गे. आर.एम व प्रा. गुजर व्ही.बी तसेच प्रकल्पासाठी आवश्यक ती माहिती देणारे विषय सहकारी यांची मी मनापासून आभारी आहे. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शासकिय कर्म यांच्या सहकार्याबद्दल मी त्यांची आभारी आहे.

Champ's IKON

Scanned with CamScanner